दैनिक
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८४ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, २ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

शिवसेनेच्या एका उमेदवाराचा पत्ता होणार कट

शिवसेनेनं गेल्याच आठवड्यात ८ उमेदवारांची यादी जाहीर केली; त्यातील एक उमेदवार बदलला जाण्याची शक्यता आहे - आमदार संजय शिरसाट

■मुंबई, विशाल कारंडे,

लोकसभा निवडणुकीसाठी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेनं गेल्या आठवड्यात ८ उमेदवार जाहीर केले. शिंदेंनी ७ जागांवर विद्यमान खासदारांना संधी दिली. तर एका जागेवर नव्या चेहऱ्याला संधी दिली. शिवसेनेनं जाहीर केलेल्या ८ पैकी एक उमेदवार बदलला जाण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे याबद्दलचे संकेत शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी दिले. एखादा उमेदवार कमजोर वाटत असल्यास तो बदलण्याचा अधिकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना आहे. एखादा उमेदवार बदलला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असं शिरसाट म्हणाले. मराठवाडा किंवा पश्चिम महाराष्ट्रातील एखादा उमेदवार बदलला जाऊ शकतो, असं शिरसाट यांनी म्हटलं. हिंगोली किंवा हातकणंगलेतील उमेदवार बदलला जाण्याची दाट शक्यता आहे.

दक्षिण मध्य मुंबईतून राहुल शेवाळे, कोल्हापुरातून संजय मंडलिक, शिडीर्तून सदाशिव लोखंडे, बुलढाण्यामधून प्रतापराव जाधव, हिंगोलीतून हेमंत पाटील, मावळमधून श्रीरंग बारणे रामटेकमधून राजू पारवे आणि हातकणंगलेतून धैर्यशील माने यांना शिवसेनेनं उमेदवारी दिली आहे. यातील रामटेक वगळता अन्य सर्व मतदारसंघांमध्ये शिंदेंनी विद्यमान खासदारांनाच पुन्हा तिकिटं दिली आहेत. हिंगोलीतून हेमंत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पण त्यांच्या उमेदवारीला भाजपचा विरोध आहे. हातकणंगलेचे खासदार धैर्यशील माने यांचं नाव डेंजर झोनमध्ये होतं. त्यांना उमेदवारी दिली जाऊ नये, इथे उमेदवार बदलण्यात यावा, अशा सूचना भाजपकडून करण्यात आल्या होत्या. पण शिंदेंनी माने यांनाच पुन्हा संधी दिली. वायव्य मुंबई, कल्याण, यवतमाळ वाशिम, नाशिक, पालघरसाठी शिंदेंनी उमेदवारांची घोषणा केलेली नाही. पालघरचे खासदार राजेंद्र गावित भाजपकडून लढण्यास उत्सुक आहेत. तर नाशिकच्या जागेवर शिवसेनेसोबत भाजप, राष्ट्रवादीचा दावा आहे. ही जागा राष्ट्रवादीला सुटू शकते. कल्याणमधून मुख्यमंत्री शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे खासदार आहेत. पण त्यांचीही उमेदवारी अद्याप जाहीर झालेली नाही. भाजपनं ठाणे, कल्याणवर दावा सांगितल्यानं शिंदेंची कोंडी झाली आहे.

पालघर जिल्ह्यावर पाणीटंचाईचे संकट जिल्ह्यातील धरणात ४० टक्केच साठा

■पालघर, दिगंबर जाधव,

यंदा कमी पाऊस झाल्याने धरणात पाणी साठले नाही. अगोदरच कमी पाणी असल्याने जिल्ह्यावर पाणीटंचाईचे सावंत होते. आता पालघर जिल्ह्यात असलेल्या धरणांमध्ये सध्या चाळीस टक्केच पाणीसाठा असल्याने येत्या काही दिवसात जिल्ह्यावर पाणीटंचाईचा संकट येणार आहे. पालघर जिल्ह्यातील सूर्या प्रकल्पाच्या धामणी, कवडास, ढेकाळे, कुरंझे, अस्वाली या धरणांमधील पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. अजूनही पावसाला अडीच ते तीन महिने असल्याने पालघरसह वसई- विरार महानगरपालिका आणि मीरा- भाईंदर महानगरपालिकेला येत्या काही दिवसात पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. आगामी दोन- अडीच महिन्यात दोन्ही महापालिकेतील पाणी पुरवठ्यात कपात होण्याची शक्यता देखील वर्तविण्यात येत आहे.

जिल्ह्यातील सर्वात मोठे असलेल्या सूर्या प्रकल्पाच्या धामणी धरणात सध्या ४० टक्के पाणीसाठा असून या धरणामधून जिल्ह्यातील शेतीसाठी पाणी सोडलं जाते. त्यामुळे अजूनही काही दिवस कालव्यामार्फत शेतीसाठी पाणी सोडलं जाणार असल्याने मे पर्यंत जिल्ह्यासह वसईवर आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकांना पाणीटंचाई भासणार असल्याने नागरिकांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आल आहे.

उद्यानातील १ हजार झाडे वाचविण्यासाठी अनोखा निर्णय पिंपरी चिंचवडमधील शेकडो नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

■पुणे, नितीन देवळेकर,

रावेत परिसरात सुमारे 3 कोटी रुपये खर्च करून महामेट्रो कडून हे इको पार्क उभारण्यात आल आहे. मात्र आता या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाने शासकीय इमारत उभी करण्याचा निर्णय घेतलाय, मात्र असं झाल्यास या पार्क मधील शेकडो झाडे कापावी लागणार आहेत. हि झाडे वाचविण्यासाठी नागरिक एकवटले असून आगामी लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

रावेत परिसरात सुमारे 3 कोटी रुपये खर्च करून महामेट्रो कडून हे इको पार्क उभारण्यात आल आहे. मात्र आता या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाने शासकीय इमारत उभी करण्याचा निर्णय घेतलाय, मात्र असं झाल्यास या पार्क मधील शेकडो झाडे कापावी लागणार आहेत. ज्यामुळे इथे निर्माण झालेली जैवविविधता नष्ट होईल. त्याचं बरोबर नागरिकांना मिळणारा ऑक्सीजन आणि हे पाच एकरवरील प्रशस्त पार्क देखील उरणार नसल्याने नागरिक या पार्कवर इमारत उभी करण्यास विरोध केला. या बाबत अनेकवेळा जिल्हा प्रशासनाकडे विनंती आणि तक्रार करून देखील सरकार आपलं मत जाणून घेत नसल्याने मतदान प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घ्यावा लागल्याचं नागरिकांचं म्हणण आहे. विशेष म्हणजे एका उद्यानातील १ हजाराहून झाडे वाचावीत या उद्देशाने नागरिकांनी हे टोकाचं पाऊल उचलल आहे. मागील दीड वर्षापासून रावेत परिसरातील मेट्रो इको पार्क नागरिकांसाठी बंद करण्यात आलं आहे. तर दुसरीकडे उद्यानातील झाडांना पाणी दिलं जातं नसल्याने ते मरणासन्न अवस्थेत गेली आहेत. हा प्रकार अत्यंत दुर्दैवी असून जिल्हा प्रशासन यासाठी कारणीभूत असल्याचं नागरिकांचं म्हणण आहे.

विकासाला मिळणार गती
विरार-अलिबाग महामार्ग फास्ट ट्रॅकवर

■ठाणे, भावना जैन

मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह परिसरातील विकासाला चालना देणारा विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर महामार्गाचे काम फास्ट ट्रॅकवर आहे. पहिल्या टप्प्यात ९६ किलोमीटरचा महामार्ग बनवण्यात येणार आहे. या कामासाठी निवड केलेल्या नऊ कंपन्यांना त्यांची मूळ कागदपत्रे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (एमएसआरडीसी) मंगळवारपर्यंत सादर करावयाची आहेत.

विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉरची एकूण लांबी १२६ किलोमीटर आहे. पहिल्या टप्प्यात नवघर (विरार) ते बलवली (पेण) दरम्यान ९६ किलोमीटरचा सुविधांनी परिपूर्ण असा मार्ग बांधला जाणार आहे. या महामार्गाचे काम अकरा टप्प्यांमध्ये केले जाणार असून निवड झालेल्या कंपन्यांच्या पात्रता कागदपत्रांची तपासणी मंगळवारी (ता. २) होणार आहे.

या महामार्गाच्या उभारणीवर १९ हजार ३३४ कोटींचा खर्च केला जाणार असून महामार्गाचे काम वेळेत पूर्ण व्हावे म्हणून एका कंपनीला जास्तीत जास्त दोन पॅकेजचे काम दिले जाणार आहे. पर्यावरण, वन्यजीव आणि सीआरझेड या तीन प्रमुख विभागांची परवानगी बंधनकारक आहे. त्यानुसार एमएसआरडीसीने पर्यावरण विभागाच्या परवानगीसाठी केंद्रीय पर्यावरण विभागाकडे अर्ज केला आहे. डिसेंबर २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

फॅन्सी नंबर प्लेट, काचेला काळी फीत लावणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध पोलिसांची मोहीम

■पुणे, अभिजीत येरुल्लू :

फॅन्सी नंबर प्लेट, काचेला काळी फीत लावल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी वाकड परिसरात एकाच दिवशी ४०६ वाहनांवर कारवाई केली. वाकड आणि थेरगाव परिसरात केलेल्या कारवाईत चार लाख ३७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. वाकड येथे एकूण ३०५ वाहनांच्या काळ्या काचा पोलिसांनी उतरवल्या आहेत. दंडात्मक कारवाई करण्यात आली. पहिल्यांदा कारवाई होत असल्यास ५०० रुपये दंड केला जातो. एकदा कारवाई करूनही काळ्या काचा काढल्या नाहीत, तर पुन्हा कारवाई करताना वाहनचालकावर १५०० रुपयांचा दंड केला जातो. वाकड येथील कारवाईत दोन लाख ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. थेरगाव येथील पदमजी पेपर मिलसमोर कारवाई केली. रस्त्यावर पार्किंग केलेल्या ४७ वाहनांवर कारवाई करून ५० हजार रुपयांचा दंड वसूल केला. शहरात सोनेरी रंगाची ऑडी मोटार घेऊन फिरणाऱ्या वाहनचालकावरही काचांना काळी फीत लावल्याप्रकरणी वाहतूक पोलिसांनी दंड आकारला. गाडीला हवा तो रंग द्या, पण काचेला काळी फीत, फॅन्सी नंबर प्लेट लावण्यापासून दूर राहण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी केले.

सराईत गुंड ठाणे पोलिसांच्या रडारवर
बसणार गुन्हेगारी कारवायांना लगाम

■ठाणे, रोहित जैसवाल,

लोकसभेची निवडणूक अगदी तोंडावर आली असून ठाणे आयुक्तालयाच्या परिसरात आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे आता लोकसभा निवडणुकीमध्ये कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ठाणे पोलिसांनी सराईत गुंडांना टार्गेट करून गजाआड करण्याची कारवाई सुरू केले आहे. निवडणूक काळात गुंडगिरी करणाऱ्या उपद्रवी लोकांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे. निवडणुकीत उपद्रवी ठरणाऱ्या संभाव्य गुंडांची माहिती गोळा करण्याचे काम पोलिसांनी हाती घेतले आहे. पोलिस आयुक्तालयातील अशा उपद्रवी गुंडांची यादी पोलिस ठाण्यांकडून मागवण्यात येत आहेत. त्यासाठी ठाणे आयुक्तालयातील गुन्हे शाखेत एमओबीचे एक स्पेशल पथक नियुक्त केले आहे. उपद्रवी आणि समाजकंटक गुंडांना निवडणूक काळात हद्दपार करण्याची कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुका जाहीर झाल्यामुळे राजकीय क्षेत्रात जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. त्याचप्रमाणे निवडणूक काळात स्थानिक उपद्रवी गुंडाकडून होणाऱ्या अमली पदार्थ आणि दारू तस्करीवरदेखील पोलिसांचा वॉच राहणार आहे. दरम्यान, कायदा सुव्यवस्था बिघडवणारे गुंड ठाणे पोलिसांच्या निशाण्यावर असून त्यांच्यावर विविध कायद्याअंतर्गत तडीपार, स्थानबद्धतेसारख्या प्रतिबंधात्मक कारवाया करून त्यांच्या मुसक्या आवळण्याची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे. एमपीडीए (झोपडपट्टी दादा कायदा) आणि तडीपारी या माध्यमातून गुन्हेगारी कारवायांना लगाम लावला जाणार आहे. निवडणूक काळात गुंडगिरी करणाऱ्या उपद्रवी लोकांवर पोलिसांनी करडी नजर रोवण्यास सुरुवात केली आहे. ठाणे आयुक्तालयातील सर्वच पोलिस ठाण्यांच्या हद्दीतून अशा उपद्रवी गुन्हेगारांची यादी मागवली आहे. पोलीस उपायुक्त अधिकाऱ्यांच्या नियंत्रणात या याद्या बनविल्या गेल्या आहेत. त्या गुंडाची दहशत, सक्रियता पाहून त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाईचे स्वरूप ठरविले जाणार आहे.

वसई किल्ला परिसरात बिबट्याचा वावर
नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

■वसई, सचिन कदम

वसई किल्ल्याच्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याने खळबळ उडाली आहे. त्याचा शोध घेण्यासाठी वनविभागाने लावलेल्या कॅमेऱ्यात सुद्धा बिबट्या असल्याचे निदर्शनास आले आहे.या बिबट्याच्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वसई पश्चिमेच्या भागात वसईचा ऐतिहासिक किल्ला आहे. या किल्ल्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे आहेत. या परिसरात शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास बिबट्याचा

संचार सुरू असल्याचे वृत्त समजताच आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच किल्ल्याच्या परिसरात खात्री करण्यासाठी ट्रॅप कॅमेरे लावले होते. या ट्रॅप कॅमेऱ्यात बिबट्याची दृश्य कैद झाली असून बिबट्याचा वनविभागाकडून शोध सुरू असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे. किल्ल्याच्या भागाला लागून ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती व कोळीवाडा आहे. याशिवाय रात्रीच्या वेळी व सकाळी या भागातील रस्त्यावर नागरिक चालण्यासाठी जातात. आजूबाजूला घनदाट झाडे झुडपे असल्याने झुडपांमध्ये लपून बसलेला बिबट्या दिसून येणार नाही त्यामुळे नागरीकांवर हल्ला होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या परिसरातून येजा करताना, रात्रीच्या सुमारास बाहेर पडताना सावधानता बाळगावी असे आवाहन वनविभागाकडून नागरिकांना करण्यात आले आहे. या बिबट्याला दुचाकीस्वाराची धडक लागली असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचा शोध वनविभागाकडून सुरू करण्यात आला आहे. बिबट्या आढळून आलेले ठिकाण हे वसई-विरार महापालिका हद्दीतील आहे. या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्यावर पथदिवे लावण्यात यावेत याशिवाय रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या झुडपे हटविण्यात यावी असे पत्र वनविभागाने पालिकेला पाठविले आहे. या रस्त्याच्या कडेला असलेल्या घनकचरा ठिकाणी श्वान व इतर प्राणी आले तर बिबट्याचे भक्ष्य होऊ शकतात. त्यामुळे रस्त्यापासून दोन्ही बाजूस १५ फुटापर्यंत झुडपी काढून स्वच्छता करण्यात यावी असेही या पत्रात म्हंटले आहे.

वांद्रे-वरळी सागरी सेतूवरील प्रवास महागणार
नवीन पथकर दर लागू

■मुंबई, यश सावंत,

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वांद्रे-वरळी सागरी सेतूवरील पथकर दरात १८ टक्क्यांनी वाढ केली आहे. त्यानुसार पथकराचे नवीन दर आजपासून लागू झाले असून चारचाकी हलक्या वाहनांना आजपासून ऐकेरी प्रवासासाठी ८५ रुपयांऐवजी १०० रुपये, तर तर मिनी बस, टेम्पोच्या एकेरी प्रवासासाठी १३० रुपयांऐवजी १६० रुपये मोजावे लागतील. त्याचवेळी ट्रक, बससाठी आजपासून १७५ रुपयांऐवजी २१० रुपये असा पथकर असेल.

एमएसआरडीसीच्या पथकर करारानुसार दर तीन वर्षांनी पथकरात वाढ होते. त्यानुसार एमएसआरडीसीने नवीन दर जाहीर केले असून ते आजपासून लागू झाले आहेत. त्याचवेळी परतीच्या प्रवासासाठी हलक्या वाहनांना आता ४२.५ रुपयांऐवजी ५० रुपये, मिनी बस, टेम्पोसाठी ६५ रुपयांवरून ८० रुपये तर, बससाठी ८७.५० रुपयांऐवजी १०० रुपये मोजावे लागणार आहेत. मासिक पाससाठीही आजपासून नवे दर लागू झाले आहेत. त्यानुसार हलक्या चारचाकी वाहनांसाठी ५,००० रुपये, मिनी बस, टेम्पोसाठी ८,००० रुपये आणि ट्रक, बस साठी १०,५०० रुपये असे मासिक पासचे दर असणार आहेत.

शहरातील कामे रखडवणाऱ्या कंत्राटदाराकडून अद्याप दंड वसुली नाही
मुदत संपूनही मुंबई महापालिकेची चालढकल

■मुंबई, विशाल पाटील,

शहर भागातील रस्त्याची कामे रखडवणाऱ्या वादग्रस्त कंत्राटदाराला मुंबई महानगरपालिकेने लावलेला ६४ कोटी रुपयांचा दंड कंत्राटदाराने अद्याप भरलेला नाही. दंडाची रक्कम एक महिन्याच्या आत भरण्याचे आदेश पालिका प्रशासनाने कंत्राटदाराला २५ जानेवारीला दिले होते. मात्र दोन महिने उलटले तरी कंत्राटदाराने हा दंड भरलेला नाही तसेच पालिका प्रशासनानेही त्याकडे दुर्लक्ष केले आहे. शहर भागातील रस्ते कंत्राटदार रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना १६८७ कोटींची कामे देण्यात आली होती. मात्र रस्त्यांची कामे सुरू करण्याचे कोणतेही प्रयत्न या कंपनीने केले नाहीत. ही कामे करण्यात कंत्राटदाराला रस नाही किंवा त्याची क्षमता नाही, असा ठपका पालिका प्रशासनाने याप्रकरणी तयार केलेल्या अहवालात ठेवला होता. कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे कंत्राटातील अटींचा भंग झालाच आहे, पण मुंबईकरांचेही नुकसान झाले आहे. असेही या अहवालात म्हटले होते. कंत्राटदाराला ६४ कोटींचा दंड करण्याबरोबरच त्याची अनामत रक्कम व इसारा ठेव रक्कम जप्त करण्याचे आदेशही प्रशासनाने दिले होते. मात्र दोन महिने उलटून गेले तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

या प्रकरणी भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला पत्र लिहून रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या रस्ते कंत्राटदाराकडून दंड वसूल करण्याबाबत पालिका उदासीन का आहे असा प्रश्न विचारला आहे. पालिकेने कंत्राटदारावर कठोर कारवाई करून इतर कंत्राटदारांवरही जरब बसवण्याची गरज असल्याचे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. तसेच पालिकेला फसवणाऱ्या या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे आणि त्याच्यावर फौजदारी तक्रार नोंदवण्यात यावी, या मागणीचा पुनरुच्चारही त्यांनी केला आहे. यापुढे रस्त्यांच्या कामांसाठी पालिकेने महानिविदा न मागवता त्याचे विभाजन करून लहान वॉर्डनिहाय निविदा काढल्या पाहिजेत जेणे करून अधिक कंत्राटदार पुढे येतील आणि रस्त्याची कामे पूर्ण करता येईल अशीही सूचना केली आहे.

//सुविचार 'या जगात काहीही अशक्य नाही. आपण जितके विचार करू शकतो ते करू शकतो आणि आपण आजपर्यंत न विचार केलेल्या गोष्टींचा विचार करू शकतो.' //



तूरडाळ पकोडा

साहित्य : १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलेचा तुकडा किसून, चिटूभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

कृती : प्रथम तूरडाळ निवडून धुऊन घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल मिरची घालून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल सुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भज्याचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपर नॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गरम तूरडाळ पकोडा चटणी अथवा केचपसोबत खाणस द्या.

नेलपेंटचा रंग दर्शवतो तुमची पर्सनॅलिटी

नखं छान दिसावीत म्हणून आपण नखांना अगदी हमखास नेलपेंट लावतो. हल्ली तर इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या आणि रंगाच्या नेलपेंट्स बाजारात मिळतात की, कोणता रंग आपण लावावा, असा प्रश्न हमखास अनेकांना पडतो. पण तरीही कितीही पेचात असलो तरी शेवटी आपण आपल्या आवडीचा रंग निवडत असतो. तुमच्या नेलपेंटचा रंग तुमची पर्सनॅलिटी दर्शवत असतो. जाणून घेऊया नेमका तुमच्या आवडीचा नेलपेंटचा रंग तुमच्या पर्सनॅलिटीविषयी काय सांगतो ते...

गोल्डन/सिल्व्हर रंग : काहींना ग्लिटरी रंग लावायला आवडतात. असे रंग लावणाऱ्या व्यक्ती कायमच आकर्षित करणाऱ्या असतात. त्यांना कायम लोकांनी आपल्याकडे पाहत राहावे असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व तसे असल्यामुळे तसे होतेसुद्धा म्हणा. गोल्डन, सिल्व्हरचे शेड लावणारे लोक म्हणूनच थोडे खास असतात.

लाल रंग : काहींना लाल रंगाच्या शेड्स इतक्या आवडतात की, तुम्हाला कायम त्यांच्या बोटांना लाल रंगाचीच नेलपेंट दिसून येते. लाल रंगामुळे तुमची बोटं अगदी चार चौघात उठून दिसतात. असे व्यक्ती फार सेक्सी, धाडसी असतात. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी असते.

काळा रंग : हल्ली खूप जण काळ्या रंगाची नेलपेंट लावताना दिसतात. काळा रंग हा ट्रेंडमध्ये असला तरी त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. काळ्या रंगाची नेलपेंट लावणारे लोक कलात्मक असतात. म्हणजे त्यांना कला क्षेत्राची आवड अधिक असते. फॅशन, संगीत अशा क्षेत्रात काम करणारे व्यक्ती असतात. काळा रंग जरी त्यांची पर्सनॅलिटी खुलवत असेल तरी अशी लोक मनाने फारच हळवी असतात.

गुलाबी रंग : आता महिलांना सर्वसाधारणपणे नेलपेंटसाठी आवडणारा रंग म्हणजे गुलाबी. आता या गुलाबी रंगातही बरेच शेड्स आहेत. म्हणजे तुम्ही हॉट पिंक हा शेड लावत असाल,तर तुम्ही बोल्ड विचारांचे असता. त्यांच्यातील सद्सद्विवेकबुद्धी चांगली असते. तर फिकट गुलाबी रंग लावणारे हळव्या मनाचे असतात. त्यांना इतरांची काळजी घ्यायला खूप आवडते. अशा व्यक्तींना इतरांची काळजी फार असते.

निळा रंग : हल्ली निळा रंगाच्या नेलपेंट्स लावायला अनेकांना आवडते. निळा रंग शांतता आणि सामंजस्याचे प्रतीक असते. अशा व्यक्ती शांत आणि समजूतदार असतात. त्यांना त्याच्या नियमानुसार वागायलाच आवडते. त्यामुळे कोणताही अन्य मार्ग स्वीकारायला तयार नसतात.

निऑन रंग : थोडेसे भडक असे निऑन रंग असतात. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगाची शेड असते. नवीन आयडियाज आणि नवीन आव्हानांसाठी ही लोक तयार असतात. या लोकांमध्ये कमालीची ऊर्जा असते. यांना नेहमी नव्या कल्पना सुचतात.

न्यूड रंग : नखांचा रंगाला जाईल असे रंग म्हणजे न्यूड रंग खूप जणांना आवडतात. अशा व्यक्ती फार स्थिर असतात. त्यांना त्यांच्या तत्त्वांना चिकटून राहायला आवडते. त्यांना त्यांचा क्लास मेंटेन करायला आवडते.

मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या सततच्या वापराने शरीरावर होऊ शकतात दुष्परिणाम?

आपण संपूर्ण दिवसभरात अनेक प्रकारची गॅजेट्स वापरत असतो. या गॅजेट्समार्फत जगभरातील घडामोडी अगदी घरबसल्या आपल्याला समजत असतात. पण या गॅजेट्सच्या सतत वापराचा परिणाम आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे होऊ शकतो. गॅजेट्सच्या आहारी गेल्याने निद्रानाशासारखे त्रास जाणवू लागल्याचे आपण अनेकदा ऐकत असतो, पण या गॅजेट्समुळे आपल्या शरीरावरही अनेक प्रकारचे दुष्परिणाम होत असतात, याचा विचार करणेही अगत्याचे आहे.

काही व्यक्तींना मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहताना सतत डोळे बारीक करून पाहण्याची सवय असते. त्यामुळे डोळ्यांच्या अवतीभोवती सुरकुत्या पडू लागतात, तसेच डोळ्यांवरही सतत ताण जाणवू लागतो. त्यामुळे स्क्रीनकडे बघताना डोळे बारीक करून बघणे टाळावे. कॉम्प्युटर किंवा मोबाइल आपल्या शरीराच्या खूप जवळ ठेवणे हे टाळावे. या गॅजेट्समधून बाहेर पडणारे रेडिओमॅग्नेटिक किरण आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. तसेच कॉम्प्युटर किंवा मोबाइल स्क्रीनमधील अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचा आणि डोळे या दोहोंना अपाय होऊ शकतो.कॉम्प्युटर वर काम करताना आपण वापरतो ती खुर्ची आरामदायक असेल असे पहावे. काही व्यक्तींना दिवसभर कॉम्प्युटरवर काम करावे लागते, त्यांनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यावी. खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल, तर त्याचा ताण पाठीच्या मणक्यांवर जाणवायला लागून, पाठदुखीचा त्रास सुरू होऊ शकतो. तसेच सतत बसून काम केल्याने पायांकडे होणारे रक्ताभिसरण व्यवस्थित न होऊन, पायांवर सूज येऊ लागते. असे होऊ नये म्हणून थोड्या थोड्या वेळाने जरासे पाय मोकळे करण्यासाठी ऑफिस मध्येच किंवा घरातल्या घरात पायी चालावे किंवा लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करावा. अनेक व्यक्तींना मोबाइल फोन खांद्याच्या व कानाच्या मध्ये धरून, एकीकडे काम करत बोलण्याची सवय असते. अशा पद्धतीने जास्त वेळ बोलत राहिल्यास मानेचे दुखणे उद्भवू शकते. तसेच कॉम्प्युटरवर खाली मान झुकवून काम करत असल्यासही मानदुखीचा त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कॉम्प्युटरचा स्क्रीन नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असेल अशा पद्धतीने ठेवायला हवा.

रात्री झोपायच्या अर्धा तास आधीपासून कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर करणे थांबवावे. त्याऐवजी मन शांत करणारे आपल्या आवडीचे एखादे चांगले पुस्तक वाचावे, किंवा शांत संगीत ऐकावे. त्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.

खास फीचरसह लॉक करा तुमचं सिमकार्ड, फोन हरवल्यावर किंवा चोरी झाल्यावर देखील राहील सुरक्षित

जर तुम्हाला तुमचा फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर सिमकार्ड किंवा नंबरचा गैरवापर टाळायचा असेल, तर सिमकार्ड लॉक करता येईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्हीमध्ये मिळत आहे.

स्मार्टफोन्समध्ये कितीही फीचर्स असले तरी त्यात खरा जीव सिमकार्ड टाकल्यावर येतो. कॉलिंग असो किंवा एसएमएस आणि मोबाइल डेटाचा वापर करण्यासाठी सिमकार्डची आवश्यकता असते. विशेष म्हणजे तुम्ही हवं असल्यास तुमचं सिमकार्ड लॉक करू शकता, त्यामुळे फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर त्याचा गैरवापर करता येत नाही. स्मार्टफोनवर लॉक सेटअप करतो तसं सिमकार्ड पण लॉक करता येतं. जर तुम्ही हे फीचर इनेबल केलं, तर सिमकार्डचा गैरवापर करता येणार नाही. कोणीही दुसरा युजर तुम्ही सेट केलेला पिन एंटर केल्याविना सिम वापरू शकणार नाही. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्ही डिवाइसेजमध्ये सहज इनेबल करता येतं.

अँड्रॉइड फोनमध्ये असं लॉक करा सिम

- सर्वप्रथम सेटिंग्स ओपन करा आणि मग सिक्युरिटी सेटिंग्स मध्ये जा.
- तिथे सर्वात खाली स्क्रोल केल्यावर मोअर सेटिंग्स वर टॅप करा.
- त्यानंतर सिमकार्ड लॉकची निस्वाद करा आणि पिन सेटअप करा.
- पहिल्यांदा तुम्हाला डिफॉल्ट पिन एंटर करावा लागेल आणि त्यानंतर नवीन पिननं सिमकार्ड लॉक करण्याचा पर्याय मिळेल.
- वेगवेगळ्या टेलिकॉम ऑपरेटर्सचा डिफॉल्ट पिन वेगवेगळा असतो. नवीन पिननं सिमकार्ड लॉक केल्यावर पिन एंटर केल्याविना सिम कार्डचा वापर करता येणार नाही.

आइओएस डिव्हाइसमध्ये असं लॉक करा सिम

- तुमच्या आयफोनच्या सेटिंग्स मध्ये जा आणि तिथे मोबाइल डाटा वर टॅप केल्यावर सिम पिनचा पर्याय निवडा.
- त्यानंतर डिफॉल्ट पिन एंटर करूनच तुम्हाला पुढे जात येईल.
- पुढे तुम्हाला चेंज पिन ऑप्शनवर टॅप केल्यावर तुमचा नवीन पिन एंटर करावा लागेल, म्हणजे सिम कार्ड लॉक होईल.
- हा पिन एंटर केल्याविना सिमकार्ड वापरता येणार नाही. फोन रीस्टार्ट केल्यावरदेखील हा पिन टाकावा लागेल.

स्पृहा जोशीचं छोट्या पडद्यावर कमबॅक! 'कलर्स मराठी'वर सुरू होणार नवी मालिका

'उंच माझा झोका', 'अग्निहोत्र', 'लोकमान्य', 'एका लग्नाची तिसरी गोष्ट' अशा एकापेक्षा एक जबरदस्त मालिकांमध्ये स्पृहा जोशीने आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. नाटक असो किंवा मालिका स्पृहाचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. आता लवकरच अभिनेत्री एका नव्या मालिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे.

'कलर्स मराठी' वाहिनीवर लवकरच 'सुख कळले' ही मालिका सुरू होणार आहे. यामध्ये स्पृहाबरोबर अभिनेता सागर देशमुख मुख्य भूमिकेत झळकणार आहे. ही मालिका २२ एप्रिलपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या मालिकेद्वारे सगळ्यांना माधव-मिथिलाच्या सुखी संसाराची गोष्ट अनुभवता येणार आहे. माधव-मिथिला या दोघांचं सुख नेमकं कशात आहे हे सांगणारी गोड मालिका म्हणजे 'सुख कळले!'

स्पृहाच्या मालिकेच्या शूटिंगला आता सुरुवात झाली आहे. सेटवरच्या शूटिंगचा पहिल्या दिवसाचा व्हिडीओ तिने नुकताच इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. घरातून सकाळी ७.३० पासून सुरू झालेला दिवस, त्यानंतर सेटवरचं शूटिंग ते थेट रात्री ११.३० वाजता घेतलेली विश्रांती याची झलक अभिनेत्रीच्या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. तसेच या व्हिडीओला तिने ''शूटच्या पहिल्या दिवसाची छोटीशी झलक'' असं कॅप्शन दिलं आहे.

दरम्यान, स्पृहाने शेअर केलेल्या व्हिडीओवर सुव्रत जोशी, सोहम बांदेकर, नंदिता पाटकर, अवधुत गुप्ते, संग्राम समेळ, सुरुद गोडबोले यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. येत्या २२ एप्रिलपासून ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता ही नवीन मालिका सुरू होण्यापूर्वी कलर्सवरील कोणती मालिका प्रेक्षकांचा निरोप घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

"अचानक मालिकेतून काढलं अन्...", 'आई कुठे काय करते' फेम अभिनेत्रीने सांगितला 'तो' कठीण प्रसंग; म्हणाली, "मी खचले..."

अभिनेत्री म्हणून तिला ओळखलं जातं. तिच्या सहज व सुंदर अभिनयाचे हजारो चाहते आहेत. मालिकांशिवाय अक्षयाने बऱ्याच मराठी चित्रपटांमध्येही काम केलेलं आहे. याशिवाय तिने काही दिवसांपूर्वीच 'आई कुठे काय करते' या लोकप्रिय मालिकेत एन्ट्री घेतली होती. यानंतर नुकतीच तिने 'हंच मीडिया' या युट्यूब वाहिनीला मुलाखत दिली. यावेळी इंडस्ट्रीत आलेल्या बऱ्याच अनुभवांबाबत अभिनेत्रीने भाष्य केलं.

''मध्यंतरीच्या काळात इंडस्ट्रीपासून तू दूर होतीस का?'' या प्रश्नावर अक्षया म्हणाली, ''हो...मी सलग चित्रपट केले नाहीत. पण, आजवर जी कामं केली आहेत ती सगळी उत्तमप्रकारे करून काहीशा वेगळ्या धाटणीच्या भूमिका मी निवडल्या होत्या. प्रत्येक कलाकाराच्या आयुष्यात एक संघर्षाचा किंवा वाईट काळ येतो. तसाच माझ्याही आयुष्यात आला होता, तेव्हाच माणूस स्वतःच्या पायावर उभा राहायला शिकतो. गेल्यावर्षी माझ्या नवऱ्याचं ऑपरेशन झालं होतं आणि आम्ही दोघंही एकाच इंडस्ट्रीत काम करतो. ऑपरेशन झाल्याने तो जवळपास ५ ते ६ महिने घरी होता आणि त्या काळात माज्याकडे काही कामच नव्हतं.''

अक्षया पुढे म्हणाली, ''तो काळ माझ्या आयुष्यातील सगळ्यात वाईट काळ होता. मी काही लोकांना सांगितलं होतं की, 'प्लीज काम द्या' त्या दिवसांमध्ये मी कोणतीही भूमिका करण्यासाठी तयार होते. कारण, प्रत्येक कलाकारासाठी काम खूप महत्त्वाचं असतं. त्या मधल्या काळात मला एका शोसाठी ऑफर आली होती. मोठं चॅनेल आहे त्यामुळे मी नाव घेणार नाही. त्यांनी मला फायनल केलं, लूक टेस्ट, मॉक शो झाले, संपूर्ण प्रक्रिया पार पडली आणि अचानक आदल्या रात्री मला फोन करून सांगितलं तुझ्याबरोबर आम्ही काम करणार नाही. आम्ही त्या पात्रासाठी दुसरी अभिनेत्री कास्ट केली आहे.''

दैनिक लोकरक्षणाय सुडोकू - ४५

8	9		5			3		
1	5				6		2	
2					9	1		7
5			8			9	6	
	4	8	6	2				
	6				1			
		3	2				1	
	2			4		7	8	
	1	5		6				

उत्तर सुडोकू -४४

6	9	2	8	5	3	7	1	4
1	3	4	9	6	7	8	2	5
5	7	8	1	2	4	3	9	6
9	4	3	2	7	6	1	5	8
2	1	5	4	8	9	6	3	7
7	8	6	3	1	5	9	4	2
8	6	9	5	4	1	2	7	3
3	5	7	6	9	2	4	8	1
4	2	1	7	3	8	5	6	9

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

दिनविशेष

२ एप्रिल

- १८७०: गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या प्रेरणेने पुणे सार्वजनिक सभेची स्थापना झाली.
- १९८२: फॉकलंडचे युद्ध - अर्जेंटिनाने फॉकलंड बेटे पादाक्रांत केली.
- १८९४: छत्रपती राजार्षी शाहू महाराज यांचा राज्याभिषेक झाला.
- १९८४: सोयुझ टी-११ या अंतराळयानातून राकेश शर्मा या पहिल्या भारतीय अंतराळवीराने उड्डाण केले. ते ७ दिवस २१ तास ४० मिनिटे अवकाशात होते.
- १९८९: ताणलेले संबंध सुधारण्यासाठी रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोबार्चेव्ह यांचे क्यूबातील हँवाना येथे आगमन.
- १९९०: स्मॉल इन्डस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली.
- १९९८: कोकण रेल्वेवरून धावणारी निजामुद्दीन तिरुअनंतपुरम राजधानी एक्स्प्रेस या गाडीचा प्रारंभ झाला.
- २०११: क्रिकेट विश्वकरंडक स्पर्धेत भारताने २८ वर्षांनंतर विजय मिळवला.
- १८०५: डॅनिश परिकथालेखक हान्स अँडरसन यांचा जन्म.
- १८७५: ख्राइसलर कंपनीचे संस्थापक वॉल्टर ख्राइसलर यांचा जन्म. (मृत्यू: १८ ऑगस्ट१९४०)
- १८९८: हिंदी चित्रपटांतील प्रसिद्ध चरित्र अभिनेते व सरोजिनी नायडू यांचे बंधू हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: २३ जून १९९० - मुंबई, महाराष्ट्र)
- १९०२: पतियाळा घराण्याचे गायक बडे गुलाम अली खाँ यांचा जन्म. (मृत्यू: २५ एप्रिल १९६८ - हैदराबाद, तेलंगण)
- १९२६: कवी व गीतकार सूर्यकांत रामचंद्र खांडेकर यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून १९७९)
- १९४२: भारतीय इंग्रजी-अभिनेते रोशन सेठ यांचा जन्म.
- १९६९: हिंदी चित्रपट अभिनेता अजय देवगण यांचा जन्म.
- १९७२: भारतीय नृत्यदिग्दर्शक रेमो डिसूझा यांचा जन्म.
- १९८१: भारतीय स्टँड-अप कॉमेडीयन कपिल शर्मा यांचा जन्म.
- १८७२: मोर्स कोड तारायंत्राचे जनक आणि चित्रकार सॅम्युअल मोर्स यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १७९१)
- १९३३: क्रिकेट खेळाडू महाराजा के. एस. रणजितसिंह यांचे निधन. (जन्म: २७ एप्रिल १७९१)

भविष्य

मेष असुरक्षितता अथवा आत्मविस्मृतीच्या भावनेमुळे चक्कर येईल. तुमच्या नियमित कष्टांचे आज चांगल चीज होईल.

वृषभ विश्रांती घ्या आणि कामात व्यग्र असताना मधेमधे थोडा आराम करा. वाईट सवयी तुम्हाला जडविण्यासाठी कारणीभूत ठरणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहा.

मिथुन चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. तुमच्या पालकांसोबत तुमचा आनंद वाटा.

कर्क तुमचे विनयशील वागण्याबद्दल कौतुक होईल. अनेक लोक तुमच्यावर स्तुतिसुमने उधळतील. मित्रांच्या मदतीमुळे आर्थिक अडचण सुकर होईल.

सिंह तुमच्या विचारांवर ज्यांचा असाधारण प्रभाव आहे अशा विशेष व्यक्तीची ओळख मित्रामुळे होऊ शकते. किरकोळ आणि ठोक व्यापाऱ्यांसाठी चांगला दिवस.

कन्या अलिकडे घडलेल्या घटनांमुळेतुमचे चित्त विचलित होईल. ध्यानधारणा आणि योगासने यामुळे तुम्हाला शारीरिक व अध्यात्मिक फायदा होईल. आज कार्य क्षेत्रात तुमच्या कुणी जुन्या कामाचे कौतुक होऊ शकते.

तुला भावनिकदृष्ट्या तुम्ही स्थिर व्यक्ती नाही आहात, त्यामुळे इतरांसमोर कसे वागता बोलता त्याबाबत सावध असणे योग्य ठरेल. स्थावर जंगम मालमत्ता गुंतवणूक लाभदायी ठरेल.

वृश्चिक विनाकारण स्वतःची निंदा करून तुमचा उत्साह घालवू नका. दिवसाच्या उत्तरार्धात आराम करा. कामातील दबावामुळे मानसिक खळबळ आणि अशांती वाढेल.

धनु आजच्या दिवशी तब्येत एकदम उत्तम असेल. तुम्हाला जिथे बोलण्याची गरज नाही तिथे तुम्ही बोलू नका. जबरदस्ती बोलण्याच्या कारणाने तुम्ही स्वतःला चिंतेत टाकू शकतात.

मकर तुमच्या वडिलांचा सल्ला आज तुम्हाला कामाच्या क्षेत्रात धन लाभ करवून देऊ शकते. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील. शक्य असेल तर लांबचा प्रवास टाळणे चांगले.

कुंभ तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. तुम्हाला एकाकी वाटेल तेव्हा तुम्ही तुमच्या कुटूंबियांची मदत घ्या. त्यामुळे नैराश्यापासून तुमचा बचाव होईल. परिणामी सुयोग्य, संयुक्तिक निर्णय घेण्यास तुम्हाला मदत होईल.

मीन आजवर दबून राहीलेले सुप्त प्रश्न उभे राहील्यामुळे मानसिक तणाव येऊ शकतो. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल. कुटुंबाच्या कल्याणासाठी मेहनत करा.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

धनराशी जाता मूढापाशी..

''कर आणि मृत्यू यांइतके शाश्वत मुद्दे जगात अन्य कोणते नाहीत'', हे कालातीत विधान बेंजामिन फ्रँकलीन यांचे. ते सद्यःस्थितीत काँग्रेसला तंतोतंत लागू पडते. एकतर आगामी निवडणुकीत सत्ताधारी भाजप 'चारसो पार' जाणार असल्याने काँग्रेसचा राजकीय मृत्यू अटळ तर दुसरीकडे त्याच वेळी महासत्ता होऊ पाहणाऱ्या मायदेशाच्या तत्पर, कर्तव्यकठोर, नेक अशा आयकर खात्याने त्या पक्षास १८२३ कोटी रु. अधिक १७४५ कोटी रु. झ्र म्हणजे एकंदर ३५६७ कोटी रु. इतक्या अबब रकमेचा कर भरण्यासाठी काढलेली नोटीस. हे म्हणजे बुडून मरण पावलेल्यास पुन्हा तोफेच्या तोंडी देण्याचा आदेश काढण्यासारखे. तसे झाले आहे खरे. तेव्हा त्याची दखल घेणे क्रमप्राप्त. एरवी खरे तर काँग्रेस पक्षात दखलपात्र असे उरले आहे काय? जेमतेम पन्नास खासदारांचा हा पक्ष कुठे आणि त्या विरोधात आकाराने दसपट 'चारसो पार' जाणारा सत्ताधारी भाजप कुठे? बरे याची तुलना धनगरपुत्र चिमुकला डेव्हिड विरुद्ध महाकाय शस्त्रसज्ज गोलिआथ अशीही करणे अंमळ अवघड. कारण त्या लढतीत धिटुकला डेव्हिड अजस्त्र गोलिआथचा पराभव करतो. येथे ही शक्यताही नाही. कारण 'चारसो पार' जाणाऱ्यांच्या विरोधात लढणाऱ्यांस चाळीस तरी मिळतील की नाही याची शाश्वती नाही. तेव्हा ती तुलनाही गैरच. ती करता येत नाही आणि विषय अंमळ महत्त्वाचा हे वास्तव! त्याची दखल घेताना अन्य कोणाशी बरोबरी करणे, साधर्म्य शोधणे यापेक्षा सामान्य बुद्धीस पडलेले प्रश्न मांडणे बरीक शहाणपणाचे! जसे की इतका राजकीयदृष्टया दरिद्री पक्ष करापोटी इतकी भव्य रक्कम मायभूस देणे लागतो तर अत्यंत धनवंत, यशवंत, कीर्तिवंत आणि मुख्य म्हणजे सत्तावंत भाजपचे करपात्र देणे किती? ते पक्षाने कधी दिले? कशा रूपाने दिले? म्हणजे कररक्कम रोख भरली, धनादेशाद्वारे दिली की देशातील उद्योगपुत्र दानशूर राधेयांनी उदार अंतःकरणाने दिलेले रोखे आयकराकडे वर्ग केले? भाजपची नैतिक स्वच्छता आणि टापटीप लक्षात घेता आपली सर्व करपात्र देय रक्कम भाजपने सरकार दरबारी भरली असेल याबाबत तीळमात्रही संशय घेण्याचे कारण नाही. तथापि काही वैश्विक कारणांनी ही रक्कम भरण्यास काहीसा विलंब झाला असल्यास कार्यतत्पर, कर्तव्यकठोर (यापुढे का. क.) आयकर खात्याने यासाठी अशी काही नोटीस जारी केली होती काय? हे झाले काही कडेकडेचे, सामान्यज्ञानाधारित प्रश्न. आता मूळ मुद्दा कर रकमेच्या देण्यांचा. करपात्र उत्पन्न असणाऱ्या प्रत्येक व्यक्ती/संस्था आदींनी आपल्या उत्पन्नावर कर भरणे आणि तसे विवरण पत्र सादर करणे अपेक्षित असते. तशी ती भरल्यावर त्यांची सखोल छाननी होते आणि ज्ञात उत्पन्नावर देय रकमेपेक्षा कमी कर भरल्याचे आढळल्यास आवश्यक कर भरण्यासाठी आयकर खात्यातर्फे रीतसर नोटिसा धाडल्या जातात आणि तफावत रक्कम भरण्यासाठी मुदत दिली जाते. त्या मुदतीत ही रक्कम न भरली गेल्यास सणसणीत दंड आकारला जातो. ही सर्व प्रक्रिया निश्चितच काँग्रेसबाबतही पार पडली. पण यातील कळीचा मुद्दा असा की काँग्रेसने अपेक्षित कर भरलेला नाही, याचा साक्षात्कार का.क. आयकर खात्यास स्वतःच्या कार्यालयीन विश्लेषणातून झाला का? उपलब्ध तपशिलाधारे बोलायचे तर या प्रश्नाचे उत्तर ह्यनाहीह्न असे आहे. त्याउप्पर प्रश्न असा की मग का. क. आयकर खात्यास काँग्रेसच्या करचुकवेगिरीचा सुगावा नक्की लागला कसा? आणि कधी? तर झाले असे की काँग्रेसचे अत्यंत भ्रष्ट (वास्तविक ही पुनरुक्ती म्हणजे पितांबर पिवळा असतो असे म्हणणे. असो.) असे नेते कमलनाथ आणि कर्नाटकाचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्या निवासस्थानी घातलेल्या धाडीत का. क. आयकर खात्यास डायऱ्यांत काही नोंदी सापडल्या आणि त्यातील पैशाच्या देवाण-घेवाणीच्या उल्लेखाधारे का. क. आयकर खात्याने त्या पक्षास सदरहू कर भरण्याच्या नोटिसा बजावल्या. हे योग्यच झाले. भ्रष्ट मार्गाने जमवलेल्या निधीचा तपशील आपल्या डायऱ्यांत नोंदवण्याचा अजागळपणा करणाऱ्या पक्षास असा धडा शिकवायलाच हवा. पण पुढील प्रश्न असा की याआधी लालकृष्ण अडवाणी-कालीन गाजलेली जैन डायरी, तसेच सहारा-बिर्ला डायरी वा गेला बाजार येडियुरप्पा डायरी यांतील कथित नोंदींच्या आधारे का. क. आयकर खात्याने अशीच चौकशी केली होती काय? नसेल तर त्या डायऱ्यांतील नोंदींच्या आधारे ती प्रकरणे पुन्हा चौकशीस खुली केली जातील काय? या ढोबळ मुद्दयांनंतर काही तपशिलात्मक सवाल. जसे की काँग्रेसने आयकर खात्यास सादर केलेल्या तपशिलांत आढळलेल्या त्रुटी. त्यानुसार काँग्रेसच्या उत्पन्नातील १४ लाख रुपयांचा नक्की स्रोत काय, असा प्रश्न का. क. आयकर खात्यास पडला. यावरून या खात्याची विचक्षण नजर किती भेदक आहे ते कळते. हे १४ लाख रु. कोठून आले, कोठे गेले इत्यादी तपशील देण्यास काँग्रेस पक्ष अपयशी ठरल्याने त्यावर कर भरण्याची नोटीस का. क. आयकर खात्याने काँग्रेसच्या मुखावर भडकावली. अगदी योग्यच ही कृती. परंतु त्याच वेळी जनप्रतिनिधित्व कायद्याचा भंग करीत भाजपच्या उत्पन्नात भर घालणाऱ्या १२९७ देणगीदारांचा आवश्यक तपशील त्या पक्षाने सादर केलेला नाही. या १२९७ देणगीदारांकडून भाजपच्या तिजोरीत ४२ कोटी रु. जमा झाले. म्हणजे का. क. आयकर खाते १४ लाख रुपयांवरील कर भरण्यासाठी जंगजंग पछाडत असताना त्याच वेळी ४२ कोटी रु. इतक्या रकमेवरील कररकमेकडे दुर्लक्ष करते किंवा काय, इतकाच काय तो मुद्दा. त्याचे स्पष्टीकरण आयकर खात्याने अथवा त्या खात्याचे मायबाप असलेल्या सत्ताधारी भाजपने तरी करावे काकी या खात्याच्या का. क. प्रतिमेवर शिंतोडे उडणे टळेल. तसेच मालदार भाजपस एक कर न्याय आणि त्या पक्षाच्या विरोधकांस दुसरा असे चित्र निर्माण होणार नाही.

अर्थसंकल्प एक प्रकारचा कायदाच

आपले एक आर्थिक वर्ष कालच संपले, आर्थिक वर्षाच्या संदर्भात दरवर्षी एका दिवशी संसदेत काय होत आहे, याची सर्वच जण वाट बघत असतात. तो दिवस म्हणजेच संसदेत अर्थसंकल्प सादर होण्याचा दिवस. या अर्थसंकल्पात काय आहे, याची सर्वांनाच उत्सुकता असते. अर्थसंकल्पाची तरतूद भारतीय राजघटनेत आहे.

भारतीय राज्यघटनेत अर्थसंकल्पाला 'वार्षिक वित्तीय विवरणपत्र' असा शब्द वापरला आहे. अर्थसंकल्पात भारत सरकारकडे पैसे कोणकोणत्या माध्यमातून येतील आणि ते कुठे कुठे खर्च केले जातील, याचे विवरण असते. एक प्रकारे पुढील वर्षभर देशाचा खर्च चालवण्यासाठी संसदेची मान्यता घेण्याची ही प्रक्रियाच असते.

अर्थसंकल्प म्हणजे देखील एकप्रकारे कायदाच असतो. दरवर्षी राष्ट्रपतींच्या अनुमतीने हा अर्थसंकल्प संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर केला जातो. आर्थिक बाबींसंदर्भात वित्त विधेयके आणि धन विधेयके हे विधेयकांचे दोन प्रकार आहेत.

कोणताही नवीन कर लावण्याबाबतचे धन विधेयक अथवा वित्त विधेयक हे राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय सादर केले जाऊ शकत नाही. तसेच नवीन कर लावण्याबद्दलचे विधेयक हे राज्यसभेत सादर केले जाऊ शकत नाही, ते लोकसभेतच सादर करावे लागते. अर्थसंकल्पाच्या बाबतीत राज्यसभेला अत्यंत मर्यादित अधिकार असून राज्यसभेला अर्थसंकल्प फेटाळण्याचे अधिकार नसून केवळ सुधारणा सुचविण्याचे अधिकार आहेत. लोकसभा या सुधारणा स्वीकारू शकते अथवा नाकारून अर्थसंकल्प संमत करू शकते.

अर्थसंकल्पातील भारताच्या एकत्रित निधीतून केल्या जाणाऱ्या खर्चावर म्हणजेच राष्ट्रपती, उच्च व सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधीश आदींचे पगार अथवा कोणत्याही कायद्यामध्ये सूचित केला गेलेला एकत्रित निधीतील खर्च याबाबत लोकसभेत मतदान होत नाही, त्यावर केवळ चर्चा होऊ शकते.

अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर संसदेच्या सभागृहात विभागनिहाय चर्चा होते, तसेच विविध विभागांच्या संसदीय समित्यांकडून अर्थसंकल्पाची चिकित्सा व अभ्यास केला जातो. त्यानंतर अर्थसंकल्पावर विभागनिहाय मतदान होते.

अर्थात यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे हे मतदान केवळ लोकसभेत होते. त्यानंतर अर्थसंकल्पातील मंजूर बाबींचे विनियोजन विधेयकात रूपांतर होते. या विधेयकास राष्ट्रपतींनी संमती दिल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होते. एखाद्या विशिष्ट बाबतीत किंवा एकापेक्षा अनेक बाबतीत अर्थसंकल्पात केली गेलेली तरतूद अपुरी पडत आहे, असे लक्षात आल्यास वित्तीय वर्षात कधीही पुरवणी मागण्या सादर करून त्याबाबतची तरतूद केली जाऊ शकते.

अर्थसंकल्पामध्ये विविध निधींची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये सरकारला मिळालेला सर्व महसूल व कर, कर्जे व कर्जांच्या परतफेडीदाखल मिळालेला पैसा, हे सर्व मिळून भारताचा एकत्रित निधी तयार होतो.

या निधीतील एक रुपयादेखील सरकारला संसदेच्या संमतीशिवाय वापरता येत नाही. तसेच एकत्रित निधीत जमा झालेला पैसा सोडून बँकांतील रकमांवर मिळालेले व्याज इत्यादी निधी हा राज्य एकत्रित निधीत जमा होतो, हा पैसा खर्च करण्यासाठी संसदेच्या मंजुरीची गरज नसते. राज्यघटनेद्वारे आकस्मिकता निधी कायदा करण्याचे संसदेला सूचित करण्यात आले आहे. हा निधी सरकारला आपत्कालीन परिस्थितीत वापरता येतो.

धन विधेयक आणि वित्त विधेयकात तांत्रिक स्वरूपाचा फरक आहे. एखादे विधेयक हे धन विधेयक आहे अथवा नाही यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा लोकसभेच्या अध्यक्षांना आहे. यापूर्वी असेही आढळून आले आहे की, राज्यसभेत एखादे विधेयक मंजूर होण्यास काही अडचणी दिसत असल्यास सदर विधेयकाला धन विधेयक बनवून अशा विधेयकास राज्यसभेच्या मंजुरीची गरजच नसल्याची घटनात्मक परिस्थिती निर्माण केली जाते.

धन विधेयक लोकसभेने संमत करून राज्यसभेकडे पाठवल्यानंतर ते चौदा दिवसांच्या आत मंजूर करून अथवा शिफारशींसह राज्यसभेला लोकसभेकडे पाठवावे लागते. अशा शिफारशी स्वीकारायच्या अथवा नाही याचा अंतिम अधिकार लोकसभेचा आहे.

भारतीय राजघटनेच्या कलम २६५ नुसार कायद्याने अधिकार दिल्याशिवाय कोणताही कर आकारला अथवा वसूल केला जाऊ शकत नाही, अशी स्पष्ट तरतूद आहे. अर्थसंकल्पी चर्चेमध्ये कपात सूचना नावाचे संसदीय आयुध असून, त्याद्वारे विरोधी पक्ष अर्थसंकल्पात कपात करण्याचे सुचवतो. अशी कपातसूचना मान्य झाल्यास तो सरकारचा मोठा नैतिक पराभव मानला जातो. एकंदरच देशाचा अर्थसंकल्प ही अत्यंत किचकट अशी प्रक्रिया आहे, मात्र ही किचकट प्रक्रिया पार पाडल्याशिवाय कोणत्याही सरकारला गत्यंतर नसते!

रोख्यांचे वादग्रस्त 'औषध'

निवडणूक रोख्यांमागे दडलेले सत्य देशासमोर येताच भाजप नेत्यांना लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देणे अवघड होत आहे. तुरुंगात असलेल्या आरोपींकडून रोख्यांच्या माध्यमातून वसुली केल्याचेही दिसते. निवडणूक रोखे केवळ पक्षासाठी निधी जमविणे एवढाच उपक्रम आहे, असे म्हणता येणार नाही.

त्याचा संबंध प्रत्येकाच्या अनारोग्यापर्यंत पोहचतो काय, हे ही तपासण्याची गरज आहे. ज्या कंपन्यांची औषधे अनेक चाचणीअंती प्रमाणित होऊ शकत नव्हती, सोप्या भाषेत सांगायचे तर निकृष्टठरत होती, अशा कंपन्यांनीही शेकडो कोटींचा निधी राजकीय पक्षांना दिला आहे.

रोख्यांच्या बदल्यात औषधांना हिरवा कंदिल मिळाला असेल तर तो जनतेच्या आरोग्याशी खेळण्याचा गंभीर प्रकार ठरेल. रोख्यांची माहिती उघड होऊ नये म्हणून सर्वोच्च न्यायालयात अयशस्वी प्रयत्न झाले. तशात ज्येष्ठ विधिज्ञ हरीश साळवे यांच्यासह सहाशे वकिलांनी सरन्यायाधीशांना पत्र लिहिले.

न्यायपालिकेवर विशिष्ट गटाचा दबाव आहे, असे त्यात म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाच्या दणक्यामुळे लोकसभा निवडणूक होईपर्यंत माहिती रोखण्याचा सरकारचा प्रयत्न फसला. बँकेला नाईलाजाने का होईना निवडणूक आयोगाकडे दोन दिवसांत माहिती द्यावी लागली आणि सरकारची बाजू मांडणारे साळवे तोंडघशी पडले.

समोर कोणता दिग्गज वकील आहे हे पाहूनच न्यायालयाचे निकाल लागतात, असे तर्क लावले जायचे. परंतु सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी हा तर्क खोटा ठरवला. 'आम्ही कायम स्वच्छ', असा दावा करणाऱ्या सरकारचा दावा निवडणूक रोख्यांबाबतच्या वास्तवाने फोल ठरला आहे.

गेल्या काही वर्षांत सर्वोच्च न्यायालयातील निवडक निकालांमुळे न्यायपालिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले जात होते. त्याला रोख्यांबाबतच्या निकालाने विराम मिळाला आहे. न्यायपालिकेतही 'आम' आणि 'खास' अशा विभागणीमुळे लोकशाही धोक्यात येत असल्याचा आरोप सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांचाच होता.

१२ जानेवारी २०१८ रोजी न्यायाधीश चेलमेश्वर, रंजन गोगोई, मदन लोकूर आणि कुरियन जोसेफ यांनी पत्रकार परिषद घेऊन तत्कालिन सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या कार्यप्रणालीवर बोट ठेवले होते. लोकशाहीला धक्का लागू नये म्हणून या न्यायाधीशांना पत्रकारांपुढे यावे लागले.

त्यावेळी असे वाटले की, चुकीच्या निर्णयात सरकारचा समाचार घेणाऱ्या न्यायपालिकेचा कणा ताठ आहे. पुढे काय झाले? दीपक मिश्रा यांच्यानंतर रंजन गोगई सरन्यायाधीश झाले. कडक, शिस्तप्रिय आणि सरकारपुढे न झुकणारे म्हणून त्यांची ख्याती होती. पुढे मोदी सरकारने त्याच गोगोईंना राज्यसभेत नेले.

'न्यायाधीश फक्त त्यांच्या ओळखीच्या व्यक्तीची नियुक्ती किंवा पदोन्नतीसाठी शिफारस करतात. त्यामुळे नियुक्ती झालेली व्यक्ती योग्य असतेच असे नाही. त्यामुळे न्यायाधीशांच्या निवड प्रक्रियेत सरकारचाही सहभाग असावा', असे कॉलेजियम प्रणालीवर टीका करणारे तत्कालीन कायदामंत्री किरण रिजिजू यांचे मत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना प्रकरणात राज्यपाल भगतसिंह कोश्यारींपासून शिंदे गटाचे कसे चुकले यावर भाष्य केले होते. परंतु 'जैसे थे' स्थिती ठेवण्याच्या निकालाने न्यायपालिकेवर दडपण असल्याचे बोलले जाऊ लागले होते.

उत्पादनशुल्क धोरण प्रकरणातील तथाकथित गैरव्यवहारात मनीष सिसोदिया तेरा महिन्यांपासून, 'आप'चे खासदार संजयसिंह सहा महिन्यांपासून तुरुंगात आहेत. त्यांच्यावर अद्याप आरोपपत्र नाही आणि जामीनही नाही. अशा घटनांमुळे या सर्वच प्रकरणात न्यायपालिकेवर दडपण आहे, असे म्हणायचे का? असेल तर ते कोणाचे?

तापत्या राजकीय वातावरणात उष्माघाताचा फटका

उष्मघाताच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचा सावधतेचा इशारा!



■ मुंबई :

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण एकीकडे जोरात तापत असतानाच दुसरीकडे वाढत्या तापमानाचा फटका विदर्भासह राज्याच्या वेगवेगळ्या भागाला बसत असून उष्माघातामुळे यंदा मार्च महिन्यातच सुमारे ३३ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने उष्माघाताची दखल घेऊन काळजी घेण्याबाबतचा कृती आराखडा तायार केला असून याबाबतची माहिती राज्यातील विविध महापालिकांसह विविध यंत्रणांना पाठवली आहे. राज्यात उष्णतच्या लाटेमुळे होणारी जिवितहानी लक्षात घेऊन आरोग्य विभागाने यंदा फेब्रुवारी महिन्यात याबाबतचा कृती आराखडा तयार केला असून आरोग्य यंत्रणेला सतर्क करण्यात आले आहे. तसेच लोकांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याबाबत व्यापक जनजागृती कार्यक्रमही हाती घेण्यात आल्याचे आरोग्य विभागाचे संचालक डॉ नितीन अंबाडेकर यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाशल्यचिकित्सकांच्या अखत्यारितील आरोग्य यंत्रणांनी व्यापक सर्वेक्षण करणे तसेच उष्णतेसदभार्तील आजारांचे सर्वेक्षण करून नियमितपणे आपले अहवाल आरोग्य विभागाच्या पोर्टलवर संकलित करण्यास सांगण्यात आले आहे. यामुळे ज्या भागात उष्णता विकारांचे प्रमाण वाढलेले आढळेल तेथे तात्काळ आरोग्य यंत्रणेला तसेच महापालिकांशी समन्वय साधून उपाययोजना केल्या जातील. उष्माघातामुळे होणा□या मृत्यूंचे डेथ ऑडिट जिल्हास्तरिय डेथ ऑडिट समितीकडून एका आठवड्यात करण्याचे आदेशही जारी करण्यात आले आहेत. देशात १९९२ ते २०१५ या काळात उष्णतेच्या लाटेमुळे २२,५६२ लोकांचा मृत्यू झाला होता. महाराष्ट्रात २०२३ मार्च ते जुलै महिन्यात राज्यात ३,१९१ लोकांना उष्माघाताचा फटका बसून रुग्णालयात दाखल करावे लागले होते तर याच काळात राज्यात २२ जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला होता. मुंबई महापालिका क्षेत्रात १५५ लोकांना उष्माघाताचा फटका बसला होता तर अमरावती १२५, बुलढाणा ४३, चंद्रपूर १९६, लातूर १९०, नागपूर ३६२, नंदुरबार २२०,नांदेड ९६, पुणे ४०९, रायगड ४१२, ठाणे १५६, वर्धा ३४० आणि यवतमाळमध्ये ९७ जणांना उष्माघाताचा फटका बसला होता. यंदा मार्च महिन्यात राज्यात ३३ जणांना आतापर्यंत उष्माघाताचा फटका बसून रुग्णालयात दाखल करावे लागल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. या पर्श्वभूमीवर कोणत्या वगार्ला उष्माघाताचा फटका बसू शकतो याचा आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना व कृती आराखडा आरोग्य विभागाने तयार केल्याचे डॉ नितीन अंबाडेकर म्हणाले. उन्हाचा फटका बसू नये यासाठी काय काळजी घ्यावी तसेच कोणते कपडे परिधान करावे याविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत असली तरी तापत्या राजकीय वातावरणाचा विचार करून आरोग्य यंत्रणेला सज्ज राहाण्यास सांगण्यात आले आहे.

यंदाच्या उन्हाळ्यात राज्यभर पुरेसा रक्तसाठा

■ मुंबई: दरवर्षी उन्हाळयामध्ये रक्ताचा प्रचंड तुटवडा निर्माण होतो आणि त्यामुळे रुग्णांचे हाल होतात. यातून मार्ग काढण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदेने आध्यात्मिक आणि सामाजिक संस्थांना रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत राज्यभरात फेब्रुवारीमध्ये ८४७ रक्तदान शिबिरे घेण्यात आली. त्यामुळे तूर्तास राज्यात रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध झाला आहे.

दरवर्षी उन्हाळयात निर्माण होणारा रक्ततुटवडयाचा प्रश्न लक्षात घेत यंदा राज्य रक्त संक्रमण परिषदेने आधीपासून प्रयत्न सुरू केले. त्यानुसार रक्त संक्रमण परिषद आणि श्री जगदगुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानातर्फे १० ते २५ फेब्रुवारीदरम्यान राज्यभर विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे घेण्यात आली. १५ दिवसांत ८४७ रक्तदान शिबिरांचे आयोजन करून ७८,२२१ युनिट रक्त संकलित करण्यात आले.

उन्हाळयामध्ये रक्तदान केल्याने आरोग्यावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. मात्र रक्तदान करण्यापूर्वी सर्बंधित व्यक्ती भर उन्हातून गेली असेल किंवा तिच्या शरीरातील पाणी कमी झाले असेल (निर्जलीकरण) तर तिने रक्तदान करू नये. निर्जलीकरण झालेले असताना रक्तदान केल्यास रक्तदाब कमी होण्याची किंवा चक्कर येण्याची शक्यता असते. त्यामुळे रक्तदानापूर्वी थोडी विश्रांती घ्यावी आणि भरपूर पाणी प्यावे, असे आवाहन इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन, मुंबई शाखेचे सचिव डॉ. भरत जगियासी यांनी केले.

उन्हाळ्यात मार्च ते मे दरम्यान नागरिक पर्यटनाला किंवा गावाकडे जातात. नागरिकांचा फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने रक्तदान शिबिरे आयोजनाचे प्रमाण घटते. परिणामी दरवर्षी उन्हाळयात मोठया प्रमाणावर रक्ततुटवडा निर्माण होतो. त्यामुळे राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून गणेशोत्सव मंडळे, धार्मिक संस्था, सामाजिक संस्था, विविध संघटना, मित्र मंडळांना रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे आवाहन केले जाते.

राज्यातील रक्तसाठा

- रक्तपेढया - ३७७
- रक्त - ७६,२५९ युनिट
- प्लेटलेट्स -१३९३ युनिट

मुंबईतील रक्तसाठा

- रक्तपेढया - ५४
- रक्त - ९१८६ युनिट
- प्लेटलेट्स - ३०९ युनिट

India must achieve economic self-reliance in 10 years

■ **Mumbai**

Prime Minister Narendra Modi has stated that India must achieve economic self-sufficiency within the next decade to offset the effects of global issues on the country. He made these statements at the Reserve Bank of India's (RBI) 90th anniversary celebrations in Mumbai.

PM Modi emphasised the significance of increasing India's economic self-sufficiency, claiming that major job opportunities will arise once the BJP-led NDA government begins its third term in June, reported PTI.

Speaking at the event in Mumbai, per the news agency report, PM Modi said, "We have to increase India's economic self-reliance."

He further said, "While deciding the target for the next 10 years, we have to keep one more thing in mind. That is- the aspirations of the youth of India. India is one of the youngest countries in the world today. RBI has an important role in fulfilling this youth aspiration."

Modi praised the government and the RBI for growing profitability and loan growth in the banking industry over the last decade, highlighting their achievements. He highlighted that public sector banks' gross non-performing assets (NPAs) have decreased dramatically from 11.25 per cent in 2018 to less than 3 per cent by September 2023.

Per another ANI report, PM Modi, commenting on the transformation of the RBI, said, "The transformation occurred because there was honesty and consistency in our efforts. This change has come because our policies, intentions and decisions were clear. When the intentions are clear, then the policies are right. When policies are right, then the decisions are right. And when the decisions are right, the results are also right."

The Prime Minister acknowledged the RBI's participation in accomplishing these milestones, adding that the "twin-balance sheet" issue had been handled and that banks were now seeing a 15 per cent loan increase, the PTI report stated.

Meanwhile, Reserve Bank Governor Shaktikanta Das reiterated the central bank's commitment to maintaining a stable and robust financial system over the next decade. He emphasised the RBI's importance as a symbol of stability and resilience in ensuring citizens' well-being.

Finance Minister Nirmala Sitharaman, who was also present at the celebrations, also praised the RBI's professional management for strengthening India's ability to deal with foreign imbalances and uncertainty. She complimented the central bank's work to manage banks' balance sheet difficulties and stabilise government bond yields, both of which are critical to the economy, reported PTI.

Abhishek Sharma completes 1,000 runs in league's history

■ **Mumbai**

Sunrisers Hyderabad all-rounder Abhishek Sharma on Sunday completed 1,000 runs in the Indian Premier League's history. He achieved the milestone during the IPL 2024 match against Gujarat Titans. in Ahmedabad.

During the IPL 2024 match against GT, Abhishek scored 29 runs off 20 deliveries smashing 2 fours and 2 sixes. He batted with a strike rate of 145.00. Abhishek Sharma represented Delhi Capitals in the 2018 season in which he scored 63 runs.

In 47 matches for SRH, Abhishek has scored 954 runs at an average of 23.26 and a strike rate of 140.5, with five half-centuries. His best score is 75. His best IPL season was back in 2022, scoring 426 runs in 14 matches at an average of 30.43 and a strike rate of over 133, including two fifties.

In the ongoing IPL 2024 season, the left-hander is the seventh-highest run-getter. In three matches, he has registered 124 runs under his belt at an average of 41.33 and a strike rate of 200.

Sunrisers Hyderabad's all-time highest run-getter is Australian legend David Warner, having scored 4,014 runs in 95 matches at an average of 49.55 and a strike rate of over 142.59. He smashed two centuries and 40 fifties for the team, with the best score of 126.

The highest run-scorer in the IPL of all time is Royal Challengers Bengaluru (RCB) batting mainstay Virat Kohli, who has scored 7,444 runs in 240 matches and 232 innings at an average of 37.78 and a strike rate of 130.27. He has scored seven centuries and 52 fifties in his IPL career, with the best score of 113.

Coming to the IPL 2024 match, SRH opted to bat first after winning the toss. However, none of the batters could post a big score. Abhishek Sharma (29 in 20 balls, with two fours and two sixes) and Abdul Samad (29 in 14 balls, with three fours and a six) were the top run-scorers for the side as they posted 162/8 in their 20 overs.

Mohit Sharma (3/25) was the pick of the bowlers for GT. Azmatullah Omarzai, Rashid Khan, Umesh Yadav and Noor Ahmed also got a wicket each. In the run chase, GT lost openers Wriddhiman Saha (25 in 13 balls, with a four and two sixes) and skipper Shubman Gill (36 in 28 balls, with two fours and a six). However, knocks from Sai Sudarshan (45 in 36 balls, with four boundaries and a six) and David Miller (44* in 27 balls, with four boundaries and two sixes), guided GT to a seven-wicket win with five balls left. Mohit was given the 'Player of the Match' award for his spell.

कोपरीच्या बंदरावरील विसर्जन घाटावर मद्यपींच्या पार्ट्या

रहिवाशांमध्ये संताप

> ठाणे पूर्व मधील विसर्जन घाट सकाळी मनमोहक दिसत असला तरी, रात्रीच्या वेळी मनात भीती असते. परिसरात दिवे सर्वच पेटत नाहीत त्यामुळे अंधार वाटतो. अशातच एखाद्या कोपऱ्यात अंधाराचा गैफायदा घेऊन दारू पिणारी मंडळी दिसतात. त्यामुळे महिलांना एकटे दुकटे फिरताना भीती वाटते.
> **- सुचित्रा भोईर (ठाणे पूर्व)**

■ **ठाणे** : येथील पूर्वेकडील चेंदणी कोळीवाडा बंदराच्या विसर्जन घाटाचा ठाणे महापालिकेने चेहरा मोहरा बदलला आहे. मात्र रात्रीच्या वेळी येथील पदपथावरील दिव्यांचा मंद प्रकाशाचा गैरफायदा घेऊन मद्यपी, गर्दुल्ले या निसर्गरम्य खाडी परिसरात धुडगूस घालत आहेत.

त्यामुळे संध्याकाळी थोडा अंधार पडतास स्त्री, पुरूषांना येथून येजा करताना भीती वाटत आहे. त्यात या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे ही चालूबंद होत असल्यामुळे रहिवाश्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ड्रीम प्रोजेक्टमधील एक कोपरी विसर्जन घाट ओळखला जात आहे. पण पालिकेच्या दुर्लक्षितपणाचा गैफायदा घेऊन मद्यपी तळीराम संध्याकाळी थोडा अंधार पडताच या घाटाचा ताबा घेऊन धुडगुस घालत आहेत. शनिवारी, रविवारीही याचा अनुभव परिसरातील रहिवाश्यांनी घेतला आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाश्यांकडून महापालिकेच्या कारभाराविरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे. ठाणे पूर्वतील मिनी चौपाटी म्हणून विसर्जन घाटाच्या चेंदणी कोळीवाडा बंदराकडे पाहिले जात आहे. येथे वॉटर फ्रंट डेव्हलपमेंटच्या माध्यमातून विविध कामे केली आहेत. त्यांच्या कान्या कोपऱ्यात बसून मद्यपी रात्रभर पॅग रिचवत असल्याचे वास्तव रहिवाश्यांकडून ऐकायला मिळत आहे.

या परिसरातहज बंदरावर ठाणेकरांची पहाटेपासून सध्या वर्दळ वाढली आहे. खाडी किनारी सूर्योदयाची मोहक दृष्य बघायला मिळत आहे. येथील अँफी थिएटरमधील व्यायामाची कसरत आणि मनाला भुरळ पाडणाऱ्या गाण्यांच्या मैफील सकाळी सकाळी रंगत आहे. मात्र संध्याकाळनंतर या परिसरातील रात्र मद्यपी, गर्दुल्यांमध्ये वैऱ्याची ठरत आहे. पथदिवे पूर्ण क्षमतेने प्रकाश देत नसल्यामुळे त्याचा गैरफादा तळीराम, माद्यपी घेऊन धुडगूस घालत आहेत. या मद्यपीच्या रात्रभर पार्ट्या रंगत आहे. येथे सुरक्षा रक्षकाची खोली असून या ठिकाणी सी सी टिव्ही कॅमेऱ्याचे चित्रण पूर्ण क्षमतेने दिसून येत नाही. यास अनुसरून ठाणे महापालिकेशी संपर्क साधला असता, या परिसरातील सी सी टिव्ही आणि प्रकाश व्यवस्था तपासण्यात येईल. असे एका अधिकाऱ्यांने सांगून त्यावर अधीक बोलणे टाळले.

आजपासून बदलला पीएफचा हा मोठा नियम
खातेदारांना फायदा होणार

■ **मुंबई** : तुमच्या भविष्य निर्वाह निधीशी संबंधित मोठा नवीन नियम आजपासून म्हणजेच १ एप्रिल २०२४ पासून लागू झाला आहे. आजपासून लागू झालेल्या नवीन नियमाचा पीएफ ग्राहकांना मोठा फायदा होणार आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेत १ एप्रिलपासून मोठा बदल करण्यात आला आहे. आतापर्यंत, नोकरी बदलताना, तुम्हाला तुमच्या पीएफ खात्यात जमा केलेले पैसे ट्रान्सफर करावे लागायचे. त्यासाठी एक फॉर्म भरून जमा करावा लागणार होता. पण आता त्याचे नियम बदलले आहेत.

आता पीएफ ट्रान्सफरचा त्रास संपला आहे. आतापासून नोकरी बदलल्यावर पीएफ आपोआप ट्रान्सफर होईल. म्हणजेच पीएफ ट्रान्सफर करण्यासाठी फॉर्म ३१ भरण्याची गरज नाही. तुम्ही आर्थिक वर्ष २०२५ पासून नोकरी बदलल्यास, तुमचे पीएफ खाते आपोआप दुसऱ्या कंपनीकडे (नियोक्ता) हस्तांतरित केले जाईल. यामुळे पीएफ खातेधारकांचे काम अधिक सोपे होणार आहे. एढऋ नियमांनुसार, कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पगाराच्या १२ टक्के पीएफसाठी योगदान द्यावे लागते आणि नियोक्त्यांना देखील या योगदानाच्या बरोबरीचे योगदान द्यावे लागते.

शिक्षण विभागाचा पाठ्यपुस्तकांमध्ये कोरी पाने जोडण्याचा निर्णय



■ **पुणे** : शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार यंदा शैक्षणिक वर्षात वह्यांची कोरी पाने जोडलेली चार भागातील एकात्मिक पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. या एकात्मिक पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी बालभारतीने ७१ कोटी ४० लाख २६ हजार रुपये खर्च केला आहे. अखर्चित असलेल्या आणि बचत झालेल्या निधीच्या वर्गीकरणातून बालभारतीला या खचार्ची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाने या संदभार्तील शासन निर्णय प्रसिद्ध केला. यंदा पथदर्शी स्वरुपात राज्यातील दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना वह्यांची कोरी पाने जोडलेली चार भागातील एकात्मिक पाठ्यपुस्तके देण्यात आली. बालभारतीने या पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली. त्यानंतर आता बालभारतीने केलेल्या ७१ कोटी ४० लाख २६ हजार रुपये खर्चाच्या प्रतिपूतीर्साठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडे गणवेश, बूट आणि पायमोजे यासाठी असलेल्या निधीतील अखर्चित असलेल्या १५ कोटी ४५ लाख ७ हजार २३० रुपयांचा निधी वापरण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्याशिवाय शिक्षण विभागाकडे २०२३-२४ अखेर असलेल्या बचतीमधून ५५ कोटी ९५ लाख १९ हजार रुपयांचा निधी बालभारतीला वितरित करण्यास मान्यता देण्यात आली.

उल्हासनगर महापालिका मालमत्ता कर विभागाची विक्रमी वसुली

■ **ठाणे** : महापालिका मालमत्ता कर विभागाने ३१ मार्च पर्यंत एकून ११२ कोटी ५४ लाख, ५४ हजार ७५५ रुपये विक्रमी वसुली झाली. गेल्या वर्षी फक्त ६४ कोटी २९ लाख वसुली झाल्याने, मालमत्ता कर विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्हे उभे ठाकले होते. उल्हासनगर महापालिकेच्या मुख्य उत्पन्नाच्या स्रोता पैकी मालमत्ता व पाणीपट्टी कर वसुलीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. गेल्या वर्षी ६०० कोटी पेक्षा जास्त थकबाकी असतांना फक्त ६४ कोटी २९ लाख वसुली झाली, कमी वसुलीमुळे विभागाच्या कार्यक्षमतेवर आरोप-प्रत्यारोप झाले होते. आयुक्त अजीज शेख यांनी सन-२०२२-२३ वर्षी विभागाकडे लक्ष देवून दोन वेळा अभय योजना लागु करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा दिला. यातूनच यावर्षी विक्रमी सर्वाधिक ११२ कोटी ५४ लाख ५४ हजार ७५५ रुपयांची वसुली झाली. तर दोन वर्षांपूर्वी सन-२०२१-२२ साली १०९ कोटी विक्रमी वसुली झाली होती. तर विभागाची थकबाजी ७०० कोटी पेक्षा जास्त झाली आहे. महापालिका मालमत्ता कर विभागाचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर, कर निर्धारक संकलक जेठानंद करमचंदनी व विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांनी मालमत्ता कर वसुलीसाठी विविध हातखंडे वापरले आहे. चालू वर्षात १५० कोटी पेक्षा जास्त मालमत्ता कर वसुली होण्याचे संकेत लेंगरेकर यांनी दिले. मोठे थकबाकीधारकांची यादी प्रसिद्ध करून थकबाकी वसुलीकडे महापालिका लक्ष देणार असल्याचे लेंगरेकर म्हणाले. महापालिकेला शासन जीएसटी अनुदान, बांधकाम परवानगी पोटी मिळणारे उत्पन्न यासह इतर पयार्यी उत्पन्नात वाढ होणार असल्याचे संकेत अतिरिक्त आयुक्त लेंगरेकर यांनी दिले आहे.

३६० कोटी रुपयांचा मालमत्ता कर आर्थिक वर्षात वसूल

■ **पनवेल** : महापालिकेची स्थापना झाल्यापासून पहिल्यांदा २०२३- २०२४ या आर्थिक वर्षात ३६० कोटी रुपये मालमत्ता कर जमा झाला आहे. ही आजपर्यंतची सर्वात उच्चांकी रक्कम आहे. १२०० कोटी रुपये थकीत मालमत्ता कर वसूलीसाठी पालिका प्रशासनाचे तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख व उपायुक्त गणेश शेटे यांनी शथीर्चे प्रयत्न केले होते. या प्रयत्नांना व्यापारी वगार्ने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिल्याने हा उच्चांकी रक्कम पालिकेच्या तिजोरीत जमा झाली. पालिका क्षेत्रातील साडेतीन लाख करदात्यांपैकी अजूनही हजारो करदात्यांनी कर जमा केलेला नाही. त्यामुळे या करदात्यांना दंड लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पालिकेमध्ये आजपर्यंत ६४७ कोटी रुपये इतका

महसूल जमा झाला आहे.

मुंबई उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल असून न्यायालयाने आजपर्यंत करवसूलीसाठी पालिकेला कोणतीही स्थगिती दिली नसल्याने पालिकेने कर वसूलीसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. मागील महिन्यात (मार्च) पालिकेचे अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, तत्कालिन उपायुक्त गणेश शेटे, मालमत्ता कर विभागाचे सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, कर अधिक्षक महेश गायकवाड आणि सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली चारही विविध प्रभाग अधिकारी यांनी मार्च महिना संपेपर्यंत १७ वेगवेगळी पथके तयार करुन या पथकांमधील कर्मचा[]यांनी करदात्यांकडून करवसूलीसाठी सुट्टी न घेता शनिवार, रविवारी देखील कार्यालये सुरू ठेवली होती. पालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व्यावसायिक करधारकांकडून वसुलीची थेट कारवाई सुरु केली. मार्च महिन्यात ५२ कोटी रुपयांचा कर वसूल झाला. यामध्ये ३० मार्च या एकाच दिवशी १२ कोटीची विक्रमी वसुली झाली. तसेच रविवारी ३.६० कोटी रुपयांची उच्चांकी वसुली झाली आहे.

८ वर्षांच्या मुलीवर शाळेत लैंगिक अत्याचार
आरोपी शिपायाला अटक



■ **मुंबई** : सांताक्रुझ येथील शाळेत शिकणाऱ्या ८ वर्षांच्या विद्यार्थिनीवर शाळेतील शिपायाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सांताक्रुझ पोलिसांनी बलात्कार व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपी शिपायाला अटक केली आहे. आरोपी गेल्या अनेक दिवसांपासून पीडित मुलीवर अत्याचार करत होता. त्याबाबत कोणाला सांगितल्यास तिला व तिच्या कुटुबियांना मारण्याची धमकी त्याने दिली होती. त्यामुळे पीडित मुलगी घाबरली होती. डिसेंबर २०२३ पासून पीडित मुलीवर आरोपी शाळेतील स्टोअर रूममध्ये अत्याचार करत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पीडित मुलीला धमकावल्यामुळे तिने हा प्रकार कुटुंबियांना सांगितला नाही. पण तिला चालताना त्रास होत असल्यामुळे कुटुंबियांना पीडित मुलीला रुग्णालयात नेले. तेथे वैद्यकीय तपासणीत तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे समजले. आरोपीने पीडित मुलीला मारहाण केली व त्यानंतर धमकावून तिच्यावर वारंवार अत्याचार केला. कुटुंबियांनी याप्रकरणी तक्रार केल्यानंतर सांताक्रुझ पोलिसांनी बलात्कार, पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर ३९ वर्षीय आरोपीला शाळेतून पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

डोंबिवलीत दामदुप्पटच्या आमिषाने ज्येष्ठांची फसवणूक

■ **ठाणे** : डोंबिवली पश्चिमेत महात्मा फुले रस्त्यावरील एका सोसायटीत राहत असलेल्या एका ज्येष्ठ नागरिक दाम्पत्याने याच सोसायटीत राहत असलेल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेची आठ लाख ७७ हजार रूपयांची फसवणूक केली आहे. कर्जाऊ रक्कम परतफेडीसाठी पैसे द्या, एक वर्षाच्या आत गुंतवणूक दामदुप्पट करून देतो, या आमिषाने ही फसवणूक करण्यात आली आहे. रश्मी सतीश कदम (६१) असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या डोंबिवली पश्चिमेतील महात्मा फुले रस्त्यावरील हिंदुस्थान बँकेच्या पाठीमागील एका सोसायटीत राहतात. विधीशा विलास कांदळगावकर (६६), विलास टी. कांदळगावकर (६७), सायली समीर काटे (३१, रा. विठ्ठलकृपा सोसायटी, मानपाडा रस्ता, डोंबिवली पूर्व) अशी फसवणूक करणाऱ्या आरोपींची नावे आहेत.डिसेंबर २०१२ पासून हा फसवणुकीचा प्रकार सुरू होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,

आरोपी कांदळगावकर दाम्पत्य आणि सायली काटे यांनी तक्रारदार रश्मी कदम यांना सांगितले की आम्ही काही रक्कम कर्जाऊ घेतली आहे. ती रक्कम आम्हाला परतफेड करायची आहे. यासाठी आपण आम्हाला सात लाख ९० हजार रुपए द्या, त्या बदल्यात आम्ही तुम्हाला वाढीव परतावा देऊ. तसेच, आपण आम्ही सांगितलेल्या एका व्यापाऱ्याकडे पैसे गुंतवणूक केल्यास त्या गुंतवणुकीवर तुम्हाला दामदुप्पट रक्कम मिळेल, अशी बतावणी आरोपींनी केली. आरोपींच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन रश्मी यांनी त्यांना कर्जाऊ रक्कम परतफेडीसाठी सात लाख ९० हजार आणि वाढीव व्याज मिळेल या अपेक्षेने रश्मी यांनी आरोपी कांदळगावकर दाम्पत्य, सायली समीर काटे यांच्या ताब्यात दोन लाख ५१ हजार रुपए दिले. तेरा वर्षाच्या कालावधीत सतत तगादा लावूनही आरोपींनी कर्ज रक्कम फेडण्यासाठी घेतलेली सात लाख ९० हजारामधील रक्कम परत करत नाहीत. तसेच वाढीव व्याज मिळवून देण्याच्या बोलीवर घेतलेले अडीच लाख रूपयांवर वाढीव व्याज नाहीच पण मूळ रक्कम आरोपी परत करत नव्हते. त्यामुळे रश्मी त्रस्त होत्या. विविध प्रकारची खोटी कारणे देऊन आरोपी मूळ रक्कम, वाढीव व्याज देण्यास टाळाटाळ करत होते. तेरा वर्ष उलटूनही आरोपी आपणास पैसे परत करत नाहीत. ते आपली फसवणूक करत आहेत, अशी खात्री पटल्यावर रश्मी कदम यांनी या फसवणूक प्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. साहाय्यक पोलीस निरीक्षक सचीन लोखंडे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

पालघर जिल्ह्यात टँकर लॉबीने केली कृत्रिम पाणीटंचाई



■ **पालघर** : निसगार्चे वरदान लाभलेला पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा आहे. जिल्ह्यात दरवर्षी समाधानकारक पाऊस पडतो. मात्र, तरीसुद्धा जिल्ह्याच्या दुर्गम आदिवासी भागात दरवर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागतात. जिल्ह्याच्या चार तालुक्यांत एव्हाना पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागल्या आहेत. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्ह्यातील अनेक भागांत जलजीवन मिशनची कामे सुरू आहेत. मात्र, अनेक कामे अनेक कारणांनी अपूर्ण अवस्थेत आहेत. काही ठिकाणी तर पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना रात्री-बेरात्री अंधारात बोअरिंगवर रांग लावण्याचीही वेळ आलेली आहे. यामुळे संबंधित गावांनी स्थानिक प्रशासनाकडे टँकरने पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे. दुर्गम आदिवासी डोंगराळ भाग असलेल्या अनेक गावांतील विहिरींनी तळ गाठला असल्याचेही दृश्य दिसून येत आहे.

पालघर जिल्ह्यात सूर्या प्रकल्पासह काही महत्त्वाची धरणेही आहेत. या जिल्ह्यातून मुंबईसह वसई-विरार, मीरा-भाईंदर या भागांना पाणीपुरवठा केला जातो, मात्र खुद्द पालघर जिल्ह्यातील नागरिकांचा घसा कोरडाच असल्याचीही स्थिती आहे. यावरून 'धरण उशाला आणि कोरड घशाला' असेही बोलले जात आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा, विक्रमगड, मोखाडा आणि जव्हार या चार तालुक्यांतील काही गावांमध्ये सध्या पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत. पालघर जिल्ह्यात यावर्षी एकूण २२६०.०१ मिलिमीटर पाऊस पडला होता. ११३.८ टक्के इतके हे प्रमाण आहे. असे असतानाही पावसाच्या पाण्याच्या साठवणुकीचे योग्य नियोजन नसल्यामुळे सध्या पाणीटंचाई जाणवत आहे. ६ गावे आणि ३६ पाड्यांत सध्या १६ टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. पालघर जिल्ह्याच्या दुर्गम भागांत पाणीटंचाईवर अद्याप मात का केली जात नाही, असाही सवाल केला जात आहे. टँकर लॉबीला पोसण्यासाठी हे सर्व केले जात आहे का, असाही आरोप होत आहे. टँकरवर दरवर्षी लाखो रुपये खर्च होतात.

कल्याण मधील बारावे येथील घनकचरा प्रकल्पाला भीषण आग

■ **कल्याण**: कल्याण पश्चिम बारावे येथील घनकचरा प्रकल्पाला रविवारी सकाळी भीषण आग लागली. आगीमध्ये कचरा केंद्रावर जमा केलेला कचरा जळून खाक झाला. या कचरा केंद्रावर कल्याण परिसरातील कचरा पालिकेकडून जमा केला जातो. या ठिकाणी कचऱ्याचे ओला आणि सुका कचरा पद्धतीने विलगीकरण केले जाते. काही दिवसांपासून पडत असलेल्या उन्हामुळे हा कचरा वाळून गेला आहे. या वाळलेल्या कचऱ्याला रविवारी सकाळी भीषण आग लागली. आगीमध्ये कचरा जळून खाक झाला. वाऱ्याचा वेग असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले केले. कचरा केंद्र परिसरात कर्मचारी नसल्याने जीवित हानी झाली नाही. आगीच्या ज्वाला दूरवरून दिसत होत्या. धुराचे लोट सर्वत्र पसरले होते. बारावी परिसरातील अनेक उंच गृह संकुलांमध्ये धूर पसरल्याने रहिवासी अस्वस्थ होते. आगीची माहिती मिळताच कल्याण डोंबिवली पालिका अग्निशन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. त्यांनी दोन तासाच्या अथक प्रयत्नाने आगीवर नियंत्रण मिळवले. गेल्यावर्षी या कचरा केंद्राला भीषण आग लागली होती. कचऱ्यामधील विविध प्रकारचे घटक उन्हामुळे तप्त होतात. त्यामधून मिथेन वायू तयार होऊन अशा आगी लागल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. काही वेळा अज्ञात इसमांकडून कचऱ्यावर पेटती काडी टाकली जाते. त्यामुळे यापुढे आगीच्या घटना घडल्या आहेत.

१२ वर्षीय दिव्यांग मुलाची दोन भावांकडून हत्या; आरोपीला अटक

■ **ठाणे**: शहरातील तळोजा परिसरात डायघर येथील ठाकूरपाड्यात राहणाऱ्या दोन भावांनी घराच्या जवळ राहत असलेल्या एका १२ वर्षीय दिव्यांग मुलाची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

आरोपी भावांना पोलिसांनी अटक केली आहे. रमझान (२०) आणि मोहम्मद (३०) असे या आरोपींची नावे आहेत. आरोपी रमझान याने घराच्या जवळ राहणाऱ्या १२ वर्षीय दिव्यांग मुलासोबत अनैतिक कृत्य करण्याच्या उद्धेशाने त्याला निर्जन स्थळी नेलं. आपल्या सोबत काही वाईट घडणार हे केल्यावर मुलाने विरोध केला असता रमझान चिडला आणि तो या घटनेची वाच्यता कुठे करू नाही म्हणूंन त्याच्या डोक्यात दगड घातला मुलाचा मृत्यू झाला आहे की नाही हे बघण्यासाठी त्याचा गळा आवळून खून केला. मुलाचा मृत्यू झाला आहे की नाही हे समजत नसल्यामुळे त्याने आपल्या भावाला मोहम्मदाला घटनास्थळी बोलावले. नंतर त्यांनी मुलाचे हातपाय बांधले आणि जवळच्या पाण्याच्या डबक्यामध्ये त्याचे प्राण जात पर्यंत बुडवून ठेवलं. मुलाच्या आईने मुलाच्या अपहरण होण्याची तक्रार पोलिसांना दिल्यावर पोलिसांनी मुलाचा शोध घेतला.

व्यावसायिक स्पर्धेतून फास्ट फुडमध्ये ठेवले पिस्तूल; गुन्हे शाखेचा अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल

■ **मीरारोड**: काशिमीरामध्ये हॉटेल-फास्ट फूडसाठी लागणाऱ्या काउंटरपासून फर्निचर आदींच्या व्यवसायातील रोषातून तीन व्यावसायिकांकडे शस्त्रे ठेवण्याचे कारस्थान करणाऱ्या दोघांना मीरा-भाईंदर गुन्हे शाखा युनिट-१ च्या पथकाने बेड्या ठोकल्या. या कारवाईत दोन पिस्तुले, तर आरोपींकडून २ पिस्तुले व जिवंत राऊंड पोलिसांनी जप्त केले. ही

पिस्तुले प्रतिस्पर्धी व्यावसायिकांच्या सामानात ठेवून त्यांनासुद्धा खोट्या गुन्ह्यात अडकवण्याच्या प्रयत्नात होते, असे पोलिस सूत्रांनी सांगितले.

काशिमीरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मीरा गावठाण महाविष्णू मंदिरशेजारी बिंदा फास्ट फूड आहे. या फास्टफूड चालकांनी भाईंदर पूर्व उड्डाणपुलाजवळ मुन्ना ऊर्फ अनिस खान या व्यावसायिकाकडून फूड काउंटर शुक्रवारी रात्री खरेदी केले होते. त्यातील कप्प्यात शस्त्रे सापडल्याने त्यांनी तत्काळ पोलिसांना कळवले. काशिमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कांबळेंसह उपनिरीक्षक शिवाजी खाडे व अन्य अधिकारी-कर्मचारी यांनी घटनास्थळी पोहोचून दीड लाख रुपये किमतीची मेड इन यूएसए लिहिलेली पिस्तूले, ८० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व ४३ जिवंत काडतुसांचे राउंड असा २ लाख ४५ हजार रुपये किमतीचा शस्त्रसाठा जप्त केला असून पोलिसांनी अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल केला.

शस्त्र सापडल्याने गुन्हे शाखेचे उपायुक्त अविनाश अंबुरे, सहायक आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मीरा-भाईंदर गुन्हे शाखा-१ चे पोलिस निरीक्षक अविराज कुराडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुन्ह्याचा तपास सुरू केला. पोलिसांनी मुन्ना यांच्याकडे चौकशी केली. पोलिसांनी तपास चालवला असता मुन्नासह अन्य दोघा व्यावसायिकांना शस्त्रांच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी व्यावसायिक प्रतिस्पर्धी फिरोज याने हा कट रचला होता, असे समोर आले. पोलिसांनी फिरोज व शाकीर या दोघांना अटक केली असून त्यांच्याकडून २ पिस्तुले पोलिसांनी जप्त केली आहेत. शाकीर हा पोलिसांच्या रेकॉर्डवरचा गुन्हेगार आहे.

ठाण्यात ट्रकला ओव्हरटेक करताना माजी सैनिकाचा मृत्यू

■ **ठाणे** : ठाण्यात ट्रकच्या चाकाखाली येऊन माजी सैनिकाचा मृत्यू झाला आहे. ट्रकला ओव्हरटेक करताना माजी सैनिक यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचे सांगितले जात आहे. मोतीलाल रामदास शिरसाट, असे मृत्यू झालेल्या माजी सैनिकांचे नाव असून ते डोंबिवली येथील ठाकुर्ली परिसरात राहायला होते.

या घटनेनंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी पुढील चौकशीला सुरुवात केली आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या शिरसाठ यांचा उपचारपूर्वीच मृत्यू झाला आहे. परिसरातील नागरिकांनी ठाणे नगर पोलिसांना या अपघाताबद्दल माहिती दिली. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांनी पुढील प्रक्रियासाठी शिरसाठ यांचे मृतदेह ठाण्यातील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले.

शिरसाठ यांच्या खिशात सापडलेल्या ओळखपत्राच्या आधारे त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला, असे पोलिसांनी सांगितले. ठाणे नगर पोलिस ठाण्याचे तपास अधिकारी तुकाराम पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिरसाठ हे ठाकुर्ली येथे दोन मुले आणि पत्नीसह राहत होते आणि ठाण्यातील एका सिक्युरिटी कंपनीत नोकरी करत होते.

ट्रकला ओव्हरटेक करताना त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडला. याप्रकरणी पोलिसांनी प्रत्यक्षदशीर्चा जबाब नोंदवत पंचनामा करण्यात आला असून ठाणे नगर पोलिसांनी ट्रकचालकावर भारतीय दंड संहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

चित्रीकरण करण्यासाठी जागा मोफत द्याल हो
पण पाकीटमारी आधी बंद करा

> असाच एक प्रकार म्हणजे पोलिस अधिकाऱ्यांचा. चित्रीकरणाच्या वेळी ते आवर्जून तिथून फेऱ्या मारतात. मध्यंतरी एका निर्मात्याला एका चित्रीकरणासाठी रस्त्यावर काही दृश्य चित्रित करायची होती; मात्र रस्त्यावर चित्रीकरणाची परवानगी तुमच्याकडे नाही. त्यामुळे गुन्हा दाखल करतो असे सांगत पोलिसांनी काही हजार रुपये उकळले. चित्रपट निर्मात्यांकडे अशा पाकीटमारीच्या अनुभवांचे हजारो किस्से आहेत. त्यामुळे, यापुढे चित्रीकरणासाठी शासनाच्या अखत्यारितील जागा जरी मोफत उपलब्ध होणार असली तरी या पाकीटमारीला आळा घालण्यासाठी सरकार काय करणार? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित झाला आहे.

■ **मुंबई** :

चित्रपटांच्या निर्मितीसाठी आता महाराष्ट्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या जमिनींवर चित्रीकरण करण्यासाठी जागा मोफत उपलब्ध करून देण्याचा शासन निर्णय राज्य सरकारने दि.१६ मार्च रोजी घेतला. आजवर शासकीय जागांवरील चित्रीकरणासाठी विशिष्ट तासांसाठी साडेचार ते पाच हजार रुपये व अधिक कर अशी माफक दरात आकारणी होत होती; मात्र चित्रीकरणाला जागा मोफत उपलब्ध करून देत या उद्योगाला अधिक पाठबळ देण्यासाठी सरकारने आता या माफक महसुलावर पाणी सोडले आहे; पण चित्रीकरणासाठी जागा जरी मोफत उपलब्ध करून दिली तरी चित्रीकरणादरम्यान यंत्रणेपासून, राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून होणाऱ्या उपद्रवाला पायंबद कोण घालणार? त्यात होणारी पाकीटमारी कोण रोखणार? हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे. आजच्या घडीला शासकीय जागेत असो किंवा मढ आयलंडसारख्या ठिकाणी होणाऱ्या खासगी जागेतील चित्रीकरण असो, येथे चित्रीकरण करणे मनस्ताप देणारेच ठरते, असा निर्मात्यांचा अनुभव आहे. शासकीय जागेत आजवर माफत दरात चित्रीकरणाला परवानगी दिली जात होती; मात्र शासकीय यंत्रणेकडून औपचारिक परवानगीचा कागद प्राप्त करण्यासाठी टेबलाखालून काही लाख रुपये मोजावे लागतात. असे पैसे केवळ एकाच शासकीय कार्यालयासाठी नाहीत तर स्थानिक पोलिस, अग्निशमन दल यांचेही हात ओले केल्याशिवाय व्यवस्थेचे सहकार्य मिळत नाही. एवढे कमी की काय; पण जिथे चित्रीकरण आहे तिथे सर्वपक्षीय कार्यकर्ते आळीपाळीने येऊन चित्रीकरणाच्या सेटवर आवर्जून हजेरी लावतात. त्यांची बोळवण काही हजार रुपयांत होते. अशी लोकं येणार हे माहिती असल्यामुळे चित्रीकरणादरम्यान निर्मात्यांचे व्यवस्थापक वेगवेगळी पाकिटे तयार ठेवतात. असे लोक चित्रीकरणाच्या सेटवर फार काळ राहू नयेत म्हणून पटकन त्यांचे पाकीट देऊन त्यांची बोळवण केली जाते.